(ञ) कोणत्याही राज्य विधीअन्वये किंवा स्वायत्त जिल्हा परिषद किंवा स्वायत्त प्रादेशिक परिषद यांच्या विधीअन्वये मान्यता दिलेले हक्क किंवा कोणत्याही राज्याच्या कोणत्याही पारंपरिक किंवा रूढिगत कायद्याखाली आदिवासींचे हक्क म्हणून स्वीकारलेले हक्क;

(ट) जैविक विविधतेत प्रवेश मिळविण्याचा हक्क आणि जैविक विविधता व सांस्कृतिक विविधता यांच्याशी संबंधित बौध्दिक मालमत्ता व पारंपारिक ज्ञान मिळविण्याचा सामूहिक हक्क

(ठ) खंड (क) ते (ट) मध्ये नमूद न केलेले परंतु वननिवासी अनुसूचित जमाती किंवा यथास्थिति, इतर पारंपारिक वननिवासी यांच्याकडून उपभोगण्यात येत असलेले, शिकार करणे किंवा जाळयात पकडणे किंवा वन्य प्राण्याच्या एखाद्या प्रजातीच्या शरीराचा भाग कापून घेणे या रूढिगत हक्कांखेरीज अन्य पारंपरिक हक्क.

(ड) ज्या ठिकाणी अनुसूचित जमाती व इतर (पारंपारिक) वननिवासी यांना १३ डिसेंबर, २००५ पूर्वी, त्यांची वैध हक्कदारी डावलून कोणत्याही स्वरुपाच्या वन जमिनीतून अवैधरीत्या निष्कासित किंवा विस्थापित करण्यात आले असेल तर त्यांचे पर्यायी जमिनीसह मूळ स्वरुपात पुनर्वसन करण्याचा हक्क.

१९८० चा ६९ २. वन(संवर्धन) अधिनियम, १९८० यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, केंद्र सरकार पुढील सुविधांकरिता वन जमिनी खुल्या करण्याची तरतूद करील आणि यात दर हेक्टरी पंच्याहत्तर वृक्षांपेक्षा अधिक नाहीत इतके वृक्ष पाडता येतील व त्याचे व्यवस्थापन सरकारकडून करण्यात येईल :-

(क) शाळा

(ख) दवाखाना किंवा रुग्णालय,

(ग) आंगणवाडया

(घ) रास्त धान्य दुकाने

(ङ) विद्युत व दूरसंदेशवाहक तारा

(च) टाक्या किंवा अन्य गौण जलाशये

(छ) पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व जलवाहिन्या

(ज) पाणी किंवा पावसाच्या पाण्यावरील शेतीची संरचना

(झ) लहान सिंचन कालवे

उपवनसंरक्षक
गोंदिया वनविभाग, गोंदिया